## Metric No 2.1.2

As Per Government Minority Development Department क्रमांक:अशैस-२००८/३३०/प्र.क्र.१६४/२००८/का.१ dated 05th August 2008, Children Welfare Centre , Versova, Mumbai Trust has been recognized as, Linguistic Minority Educational Institution and Accordingly. This Institution is recognized as Linguistic (Hindi) Minority Educational Institution.

So in this Institution as per Government GR, Higher & Technical Education Department-Manatralaya dated 12th May 2017 admission is governed (Annexure –B GR. Enclosed)

In the above allocation seats are not shown as reserved as per Government Policy. So this circular is made amply clear that the reservation Policy is not applicable to minority educational Institution. Still we admit the reserved candidates against various categories mentioned in GR.

Government of Maharashtra has established a State Common Entrance Test Cell (CET CELL) under Admission Regulatory Authority (ARA) as per the provision in Section 10 of Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015, (Herein after called the Act).

According to G.R. No. CET-2015/C.No.379/MSHI-2, Dated 4th December, 2015 and G.R. No. CET-2016/F.No.84/MSHI-2, Dated 7th April, 2016 the Competent Authority shall conduct the MAH-LL.B.- 3 Yrs. Course CET 2023 for the admission to the First Year of the Three Year Full Time-Regular Professional Degree Course in Law, for the Academic Year 2023-24.

The admissions to the following institutes will be done by the Competent Authority, provided they are approved and recognized by Government of Maharashtra and are Affiliated to any of the Non-agricultural University in the State of Maharashtra State:

1. The Government College offering B.L.S./LL.B 5 Yrs. and LL.B.3 Yrs. Degree Course,

2. All Government Aided Colleges (including Aided Minority Institutions) offering B.L.S./LL.B 5 Yrs. and LL.B.3 Yrs. Degree Course

3. All University Departments offering B.L.S./LL.B 5 Yrs. and LL.B.3 Yrs. Degree Course,

4. All University Managed Institutes offering B.L.S./LL.B 5 Yrs. and LL.B.3 Yrs. Degree Course,

5. All Un-aided colleges (including Minority Institutions) offering B.L.S./LL.B 5 Yrs. and LL.B.3 Yrs. Degree Course, covered as per the Act

Scanned with CamScanner

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित तसेच, विद्यापीठ विभाग व विद्यापीठ संचलित संस्थेतील विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्हता, शर्ती आणि सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १२ मे, २०१७

वाचा :- १) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८,
२) शासन अधिसूचना क्र.एमआयएससी.२०१५/सीआर नं.२५२/टिई-४, दि.१६.०६.२०१५,
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.सीईटी-२०१५/प्र.क्र.३७९/मशि-२, दि.०४.१२.२०१५,
४) शासन अधिसूचना क्र.टिईएस-२०१६/प्र.क्र.४७३/१००/तांशि-४, दि.२४.०४.२०१७,
५) शासन अधिसूचना क्र.सीईटी-२०१५/सीआर-२४३(भाग-२)/मशि-२, दि.०५.०५.२०१७,
६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.सीईटी-२०१६/प्र.क्र.८४/मशि-२, दि.०७.०४.२०१६,
७) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३/१५/मशि-२, दि.१२.०४.२०१६.

प्रस्तावना :-

संदर्भ क्र. २ येथील दि.१६.०६.२०१५ च्या अधिसूचनेद्वारे लागू करण्यात आलेल्या महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २ (द) अनुसार विभागाच्या अखत्यारितील व्यावसायिक शिक्षणांतर्गत येणारे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केले होते. तथापि, वरील संदर्भ क्र. ४ येथील दि.२४.०४.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे संदर्भ क्र.२ येथील अधिसूचना अधिक्रमित करुन नव्याने या विभागाच्या अधिपत्त्याखालील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सुधारित अर्हता व शर्तीबाबत अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अभ्यासक्रमांमध्ये विधी पदवी अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

Scanned with CamScanner

त्यानुसार राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील विधी पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश, आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत एक खिडकी पध्दतीने राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यास संदर्भ क्र.३ येथील दि.०४.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, राज्यातील अकृषि विद्यापीठांमध्ये सुरु असणाऱ्या विधी अभ्यासक्रमांचे प्रवेश, आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत एक खिडकी पध्दतीने राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यास संदर्भ क्र.६ येथील दि.०७.०४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

याशिवाय संदर्भ क्र.५ येथील दि.०५.०५.२०१७ च्या अधिसूचनेन्वये राज्यातील कायम विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशाबाबतची नियमावली प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरच्या उपरोक्त अधिसूचना व प्रवेश नियमांच्या धर्तीवर व संदर्भ क्र. ४ येथील तरतुदीनुसार व संदर्भ क्र.७ येथील दि.१२.०४.२०१६ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील विधी पदवी विभाग/अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्याबाबतची नियमावली प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून दि.२४.०४.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे कायम विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अधिसूचित केलेल्या अर्हता व शर्ती, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रम व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील विधी पदवी विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या आदेशान्वये लागू करण्यात येत आहेत.

२. दि.०५.०५.२०१७ रोजीच्या अधिसूचनेतील प्रवेश प्रक्रियेचा, सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद बदलांसह अवलंब करुन शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रम व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील व विद्यापीठ संचलित शैक्षणिक संस्थांमधील विधी पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश परीक्षेद्वारे एक खिडकी पध्दतीने संदर्भ क्र.३ व ६ येथील शासन निर्णयान्वये जाहिर केल्याप्रमाणे करण्यात येतील.

३. सदरच्या शासकीय/अशासकीय अनुदानित व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील विधी पदवी विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील अनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उपलब्ध



Scanned with CamScanner

जागांचे विभाजन सोबतच्या जोडपत्रातील Annexure-A मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. तसेच, विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रम व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील व विद्यापीठ संचलित संस्थामधील कायम विनाअनुदानित/स्वयंसहाय्यित विधी पदवी विभाग/अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उपलबध जागांचे विभाजन सोबतच्या Annexure-B मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५१२१५३१२५०००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible] [illegible], cn=Rohini Bhalekar
Date: 2017.05.12 15:28:00 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
४) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
५) मा. राज्यमंत्री (उच्च वतंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७) प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित उच्च महाविद्यालये ( संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत )
८) निवड नस्ती/मशि-२.



Scanned with CamScanner

## Annexure-A

Allocation of Seats for admissions to the Professional Undergraduate Degree Courses in Law into the Government, Aided Professional Educational Institutions and Aided Undergraduate Degree Departments/Courses in Law into Non-Agricultural Universities. (Annexure to the Government resolution No. CET-2017/C.R.124/17/C.E.-2, Dated-12.5.2017)

| Sr. No. | Type of Institute | No. of Seats-As % of Sanctioned Intake | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | CAP Seats | | | |
| | | Maharashtra State Candidates | All India Seats | *Quota for NRI, OCI, PIO, Foreign Candidate | Minority Quota |
| 1 | Government institution @ | 85% | 10%# | 5% | Nil |
| 2 | Government Aided institution | 85% | 10% | 5% | Nil |
| 3 | Government Aided Minority institution | 35% | 10% | 5% | 50% |
| 4 | University Department/Course (Government Aided) | 85% | 10% | 5% | Nil |

The Admissions to the Courses in these institutions shall be done by adopting the procedure laid down in Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate Law Courses) Rules, 2017 except rule 3(2)(b), rule 13.

* Maximum 5% seats within sanctioned intake will be filled through NRI, OCI, PIO Foreign Candidates by Competent Authority by adopting following procedure:-

(a) The Competent Authority shall invite Online Application from NRI, OCI, PIO Foreign student Candidates seeking admission to the Course in these institutes;

(b) The Competent Authority shall first prepare Merit List of all such applicants by following the procedure specified in rule 8(3) of the said rules;

(c) The Competent Authority shall give admission to the eligible NRI, OCI, PIO Foreign student Candidates strictly on the basis of *Inter-Se-Merit*;

(d) If the seats remains vacant from NRI, OCI, PIO Foreign student Candidates Quota, it will be filled from the All India Candidature Candidates on the basis of *Inter-Se-Merit* by Competent Authority.

@ Applied for courses run by Government in Government Law Collage, Mumbai.

# One seat of Government Law Collage, Mumbai will be filled through the nominated candidate from Bhutan Government. This seat shall be within the sanctioned intake capacity and shall be filled at the institute level with due permission of Government. If this seat remains vacant, it will be filled through All India Seats by Competent Authority.



Scanned with CamScanner

## Schedule-II
### (For First Year Admission to LL.B-3 Yrs.)

Allocation of seats for admission to the Professional Undergraduate Degree Course in Law into the Unaided (Vina-Anudanit) Professional Educational Institutions and Unaided/Self-Financed Undergraduate Degree Departments/Courses in Law into Non-Agricultural Universities. (Annexure to the Government Resolution No. CET-2017/C.R.124/17/C.E.2, Dated 12th May, 2017.)

| Sr.No. | Type Of Institute | No. of Seats- as % of Sanctioned Intake | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | CAP Seats | | | Institute Level Seats |
| | | Maharashtra State (M.S.) Candidates | All India Seats | Minority Quota | Institute Level Seats (Including 5% Quota for NRI, OCI, PIO, Foreign Candidate if applicable) |
| 1 | Unaided* (Vina-Anudanit) Institution | 65% | 15% | Nil | 20% |
| 2 | Unaided* (Vina-Anudanit) Minority Institution | 100% of M.S. Seats $ | 15% # | 51% @ | 20% |
| 3 | University Department/Course (Self-Financed/ Unaided) | 65% | 15% | Nil | 20% |

The Admissions to the Courses in these institutions shall be done by adopting the procedure laid down in Maharashtra Unaided private Professional educational Institutions ( Regulation of Admission to the Full time Professional Undergraduate Law Courses) Rules, 2017.

- Seats of the Unaided (Vina-Anudanit) Courses will be distributed as above till they become eligible for Government aid.

CAP Seats = Sanctioned Intake – Institutional Quota#
CAP seats excluding Minority Quota

$ M.S. Seats = CAP Seats – ( All India Seats + Minority Quota Seats )
The seats excluding the Minority Quota and the Institutional Quota shall be filled in thestipulated percentage from the Maharashtra Candidature Candidates and All India Candidature candidates.

@These are the Minimum percentage of seats to be filled in the Minority Institution through CAP, this may be extended up to 100%. However, before the commencement of the CAP, such Institution shall declare & inform to the Competent Authority about the maximum percentage of minority quota to be filled in their Institution.



Scanned with CamScanner